॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✲ सुविचार ✲**
जीवनातील खरी सुख-शांती
अहंकारमुक्त जीवनात आहे.



मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. १ जून २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ४८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### डॉ. सुरेश पाटेकर यांची पुन्हा नेवासा पं. समितीत बदली



**● अहिल्यानगर –** जिल्ह्यातील नेवासा पंचायत समितीच्या रिक्त असलेल्या सहाय्यक गट विकास अधिकारीपदी येवला पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी डॉ. सुरेश वि. पाटेकर यांची बदली करण्यात आली आहे. डॉ. पाटेकर यांनी राहुरी व शेवगाव येथे आरोग्य विस्तार अधिकारी म्हणुन काम केले आहे. शेवगाव पंचायत समिती येथे काम करत असतांना डॉ. पाटेकर यांना सहाय्यक गट विकास अधिकारी म्हणुन पदोन्नती मिळाली होती. त्यानंतर त्यांना नेवासा पंचायत समितीत सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणुन काम केले. डॉ. पाटेकर यांनी आपल्या कार्यकाळात कर्तव्यनिष्ठेने लोकाभिमुख कामे केली आहेत. त्यांचा विविध विषयाबाबत दांडगा अभ्यास असून जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी नेहमी कर्तव्यदक्ष असल्याने ते सर्वसामान्यांना परिचित आहेत. त्यांची पुन्हा नेवासा येथे बदली झाल्याने त्यांचे स्वागत होत आहे.

# श्रीक्षेत्र चौंडी विकासासाठी ६८१ कोटींचा विकास आराखडा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । श्रीक्षेत्र चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सोहळा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र, कार्य आणि आदर्श आज ३०० वर्षांनंतरही तितकंच प्रभावी आणि प्रेरणादायी आहे. त्यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्ताने शासनाने ६८१ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार केला आहे. त्यांच्या नावाने एक भव्य स्मारक, महिला सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान' आणि त्यांच्यावर आधारित एक बहुभाषिक चित्रपट तयार करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. या माध्यमातून त्यांचे कार्य देशभरात पोहोचविले जाईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

श्रीक्षेत्र चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे आदी उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य व विचार आजही राज्यव्यवस्थेला मार्गदर्शक आहेत. अहिल्यादेवी होळकर यांनी न्यायदानाची आदर्श




व्यवस्था भक्कमपणे उभी केली. अन्यायग्रस्तांना न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या प्रजाहितदक्ष, राज्यकारभाराचा आदर्श समोर ठेऊन राज्य शासन देखील वंचितांच्या कल्याणासाठी काम करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अहिल्यादेवींनी २८ वर्षं राज्यकारभार केला. त्यांनी केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती घडवली. मंदिरांचे पुनरुज्जीवन, घाटांचे बांधकाम, धर्मशाळांची उभारणी, गरीब जनतेसाठी पाणीपुरवठ्याची यंत्रणा आणि महिला सक्षमीकरणाचे कार्य त्यांनी अत्यंत समर्पित वृत्तीने केले.

अहिल्यादेवी होळकर यांनी सोमनाथ येथील मंदिर नव्याने बांधले. घाट, मंदिरे बांधताना, दानपुण्य करतांना सरकारी तिजोरीतून खर्च न करता स्वतःच्या संपत्तीतून खर्च केला. एवढी श्रीमंती असतानाही त्या योग्याप्रमाणे जीवन त्या साधेपणाने जीवन जगल्या. त्यांनी स्वतःसाठी धन खर्च केले नाही, तर समाजाच्या कल्याणासाठी खर्च केले, म्हणून त्या 'लोकमाता' ठरल्या.


उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे जन्मस्थान चौंडी मराठी संस्कृतीचे जागृत देवस्थान आहे. लोककल्याणकारी राज्य, सुराज्य जगाला दाखविण्याचे काम अहिल्यादेवींनी केले. अहिल्यादेवींनी सर्वसामान्य माणसांच्या विकासाचे काम केले. त्यांनी धर्मरक्षणासाठी आयुष्य समर्पित केले. महिलांसाठी सैनिक तुकडी सुरू करण्याची त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांनी महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवण दिली आहे. आज आपण लेक लाडकी म्हणतो तसे सूनही लाडकी मानली पाहिजे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कधीही बंद केली जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविक प्रा. राम शिंदे यांनी केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, आ. गोपीचंद पडळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती सोहळ्याच्या निमित्ताने लोकराज्यचा विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला आ. गोपीचंद पडळकर, मोनिकाताई राजळे, शिवाजीराव कर्डीले, सुरेश धस, आमदार विठ्ठलराव लंघे, काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, माजी मंत्री अण्णा डांगे, बबनराव पाचपुते, स्नेहलता कोल्हे, रमेश शेंडगे, प्रा. लक्ष्मण हाके, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते.

# आईवरील बिबट्याचा हल्ला मुलांनी परतावला

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील देवठाण गावातील काळे वस्तीवर भक्ष्याच्या शोधार्थ बिबट्या घरात घुसला व घरातील मायलेकावर हल्ला केल्याची खळबळ जनक घटना गुरुवारी रात्री दिड वाजन्याच्या सुमारास घडली. दोन्ही मुलांच्या धाडसामुळे आई बिबट्याच्या हल्यातून बचावली. या घटनेमुळे देवठाण व परीसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे.



किसनाबाई रामहारी काळे (वय – ५७) व वैभव रामहारी काळे (वय २७) अशी बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. देवठाण येथील पाटाच्या कडेला असणाऱ्या काळे वस्तीवरील घरात रात्री जेवणानंतर सर्वजन झोपलेले होते. रात्री दीड वाजेच्या सुमारास मांजराच्या मागे बिबट्या लागला. तो दरवाजा तोडून थेट घरात गेला. घराचे दरवाजाचा आवाज आल्यामुळे किसनाबाई या उठल्या. त्यांनी बिबट्या पाहिल्यावर आरडा ओरडा केला. त्यामुळे त्यांची मुले उठली. त्यांनी बिबट्याचा हल्ला परतावून लावला. पण या हल्ल्यात बिबट्याचा पंजा लागल्याने किसनाबाई यांचे डोक्याला गंभीर इजा झाली आहे. डोक्यातून मोठा रक्तस्राव वाहत होता. तर वैभवच्या पाठीवर व हाताला बिबट्याचा दात लागल्याने तोही जखमी झाला. यासर्व गोंधळात बिबट्या काही वेळ घरातील आतील खोलीमध्ये शिरला. काही वेळ घरात थांबून होता. नंतर त्याने तेथून अलगद पोबारा केला.

या घटनेची माहिती देवठाण गावचे माजी सरपंच व माजी पंचायत समिती सदस्य अरुण शेळके यांना मिळताच त्यांनी अकोले वनविभागाचे धिंदळे यांना फोन केला. त्यानंतर लगेचच धिंदळे व त्यांचे सहकारी अर्ध्या तासात घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळ व परिसराची पाहणी केली. जखमींना प्रथमोउपचारासाठी देवठाण प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. नंतर नाशिक येथील सिव्हिल रूग्णालयात येथे हलवण्यात आले. बिबट्याच्या या हल्ल्यामुळे देवठाण गाव व वस्ती परिसरात घबराट निर्माण झाली आहे.

# रस्ता अभावी आदिवासी महिलेची जंगलातच प्रसुती

**● अकोले । वीरभूमी–**

गावात पोहचायला रस्ता नसल्या मुळे एका आदिवासी महिलेची प्रसुती जंगलातच उघड्यावर करावी लागल्याची धक्कादायक घटना तालुक्यातील जांभळे गावच्या शिवारात घडली. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षा नंतरही रस्त्या अभावी जंगलातच महिलेची प्रसुती होत असल्याची दुदैवी घटना घडत असल्याबद्दल सामान्य माणसांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

राजेंद्र गवांदे या मुख्याध्यापकाच्या धडपडी मुळे प्रसुती नंतर लगेचच बाळ बाळंतीण आरोग्य केंद्रात पोहचले. त्यामुळे त्यांना पुढील उपचार मिळू शकले.

अकोले तालुक्यातील आदिवासी असलेल्या जांभळे गावाच्या ठाकर वाडीतील प्रतिक्षा दशरथ मधे या गर्भवती महिलेची जंगलातव प्रसूती करावी लागली, कारण वाडीपर्यंत जान्या साठीचा २ किमीचा रस्ता अद्याप पूर्ण विकसित झालेला नाही. या प्रसंगामुळे पुन्हा एकदा आदिवासी भागातील रस्त्यांच्या दयनीय परिस्थितीची वेदनादायक वास्तवता समोर आली आहे

आज सकाळी राज गवांदे यांचे माजी विद्यार्थी त्यांच्या घरी धाव घेऊन आले. त्यांनी सांगितले की त्यांच्या बायकोची प्रकृती बिघडली असून, गाडी घेऊन लवकर ठाकर वाडीपर्यंत जाणे आवश्यक आहे. राज गवांदे सर यांनी तत्काळ आपली कार घेऊन निघाले. मात्र मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे घाटातील रस्ता पूर्णपणे चिखलमय झाला होता.

परिणामी गाडी मधेच अडकली. त्याच वेळी प्रतिक्षा मधे या गर्भवती महिलेला चालत चालत वाडीपासून रस्त्याच्या दिशेने आणत असताना घाटातव प्रसूर्त वेदना सुरू झाल्या. आसपास कोणतेही वैदकीय साहित्य नव्हते परिस्थिती अत्यंत कठीण होती. मात्र त्यांच्या सासू आई आणि वाडीतील एका महिलेसह, जंगलातच त्यांनी हिम्मत करून सुरक्षित प्रसूती केली ॉक्टरांच फोनवर सल्ला, ॲम्ब्युलन्स वेळेवर पाठवली

ब्राम्हणवाडा आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनवणे यांच्याशी फोनवरून सतत संपर्कात राहून, त्यांनी तात्काळ ॲम्ब्युलन्स पाठवली. दरम्यान, नवजात बळ आगि मातेची स्थिती स्थिर आहे. या घटनेने पुन्हा एकदा ठाकर वाडी रस्त्याच्या अपुऱ्या आणि अर्धवट अवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. २०१५ मध्ये ग्रामपंचायतीने २ किमी लांबीचा घाटरस्ता सुरू केला होता, पण अपुऱ्या निधीमुळे काम थांबले. नंतर शासनदरबारी अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला, पण वनविभागाच्या अडथळ्यामुळे रस्ता आजही पूर्ण होऊ शकलेला नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून या वाडीतील शेकडो आदिवासी बाधव अजूनही जंगलातील अरुंद पायवाटांनी, पावसाळ्यात चिखलात वाट काढत, आजारी मातांना डोलीने किंवा खांद्यावर उचलून दवाखान्यात नेतात. मुलभूत आरोग्य सेवा मिळनण्यासाठी जीन धोक्यात घालण्याची वेळ त्यांच्यावर येते.

परमेश्वराच्या कृपेने प्रतिक्षा मधे आणि तिचे नवजात बाळ सुखरूप आहेत, मात्र यावेळी सुदैवाने साथ दिले. पुढच्या वेळेस असाच प्रसंग आल्यास त्याचा परिणाम गंभीरही होऊ शकतो. शासनाने आणि प्रशासनाने या भागातील रस्त्यांच्या कामाकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. रस्ता ही सुविधा नसून मूलभूत हक्क आहे, याची जाणीव या घटनेने पुन्हा एकदा करून दिली आहे.

राज गवांदे सर यांनी बाळंतिण आणि नवजात बाळाला गाडीतून रस्त्यावर आगण्याचा प्रयत केला, पग गाडी चिखलात अडकली. त्यानंतर वाडीतील मित्रांनी मिळून गाडी ढकलून बाहेर काढली. अखेर सर्व जण सुखरूपपणे ॲम्ब्युलन्सपर्यंत पोहोचले व त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. सुदैवाने बाळ आणि आई दोघेही सुरक्षित आहेत.



## SPOT NEWS



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा सर्व शासकीय कार्यालयात लावावी

**● नगर । वीरभूमी –**

सर्व शासकीय कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा असावी, या मागणीचे निवेदन भाजपच्या महिला प्रदेश अध्यक्षा चित्राताई वाघ यांना भाजपचे जिल्हा सरचिटणीस सविता प्रकाश कोटा यांनी दिले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष जयश्रीताई अहिरराव प्रदेश सचिव गीताताई गिल्डा, महिला अध्यक्षा प्रिया जानवे, लीलावती अगरवाल कालिंदीताई केसकर, रेखा मेड, संध्याताई पावसे, राखी आहेर, नीता फाटक, सुरेखा जंगम, संध्या पावसे, छायाताई राजपूत, मीराताई सरोदे, सुजाता औटी आदी उपस्थित होते. तसेच शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत सदर मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविले आहे. महाराष्ट्रासह देशभरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी शताब्दी साजरी होत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य संपूर्ण देशात व देशातील कानाकोपऱ्यात सरकारच्या माध्यमातून पोहचवले जात आहे. हे कार्य निरंतर सुरू राहणार असून, या कार्याचा एक भाग म्हणून सर्व शासकीय कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अहिल्यादेवी होळकर यांनी देशासाठी, सर्व महिलांसाठी, धर्मासाठी व मंदिरांसाठी प्रेरणादायी कार्य केले आहे त्यांचे कार्य हे निरंतर असेच तेवत ठेवण्यासाठी व त्यांची प्रेरणा घेऊन आदर्श असा समाज उभा राहणार आहे. त्यांच्या कार्याची व विचारांची प्रेरणा मिळण्यासाठी त्यांच्या प्रतिमा सर्व कार्यालयात लावण्याचे आदेश निर्गमीत करण्याचे निवेदनात म्हटले आहे.

### अहिल्यानगर जिल्ह्यात करोनाचे दोन रुग्ण सापडले

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महाराष्ट्रात करोना रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. नगर जिल्ह्यातही करोनाचे दोन नवे रुग्ण सापडले असून यातील एकावर नगरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर दुसर्‍याला पुढील उपचारासाठी पुण्याला हलवण्यात आले असल्याची माहिती महानगरपालिका आरोग्य विभागाच्यावतीने देण्यात आली. नगरमध्ये खासगी रुग्णालयात उपचार घेत असलेला रुग्ण अत्यावस्थेत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, राज्यात मे महिन्यात करोनाचे सर्वाधिक ४०५ रुग्ण आढळले आहेत. सद्यस्थितीत ४६७ रुग्ण सक्रिय असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, राज्यात आतापर्यंत एकूण ७ मृत्यू कोविडशी संबंधित असून हे रुग्ण आधीपासूनच विविध गंभीर आजारांनी ग्रस्त होते. मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांमध्ये काहींना मूत्रपिंड विकार, मेंदूविकार, मधुमेह, फुफ्फुसाचे विकार आणि इतर सहव्याधी होत्या. कोविडचे रुग्ण तुरळक प्रमाणात आढळत असून नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, नगरमध्ये नव्याने करोना रुग्ण आढळल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आरोग्य विभागाची तातडीने बैठक घेत सूचना दिल्या आहेत. जिल्हा रुग्णालयात करोना बाधितांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच मनपाने जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे अ‍ॅन्टीजेन चाचणीच्या ४०० किटची मागणी केली असून ज्या ठिकाणी करोना रुग्ण सापडले आहेत, त्याठिकाणी त्यांच्या संपर्कात असणार्‍यांना शोधून गंभीर लक्षणे नसणार्‍यांना घरातच ठेवण्यात येणार आहे, तर गंभीर लक्षणे असणार्‍यांवर आरोग्य संस्थेत उपचार करण्यात येणार असल्याचे मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतिष राजूकर यांनी सांगितले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा मांडवगण येथील भव्य वारसा

## त्रिशताब्दी जन्मोत्सव निमित्ताने शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनकडून कार्याचे स्मरण आणि वारसा जतन

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा त्रिशताब्दी जन्मोत्सव ३१ मे रोजी संपूर्ण भारतभर साजरा होत असताना, श्रीगोंदा तालुक्यातील त्यांचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. या निमित्ताने संस्थेतर्फे अहिल्यादेवींना त्रिवार मानाचा मुजरा करण्यात आला. त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी आणि समाजासाठी त्यांनी केलेल्या योगदानाची आठवण ठेवण्यासाठी हे प्रयत्न महत्त्वाचे ठरतात.

१७ व्या शतकात श्रीगोंदा तालुक्यात समाजासाठी योगदान देणाऱ्या सहा प्रेरणादायी महिलांपैकी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अग्रगण्य आहे. त्यांनी आपल्या दूरदृष्टीने आणि नेतृत्वाने समाजहितासाठी अनेक कार्ये केली, ज्यांचे अवशेष आजही मांडवगण येथे पाहायला मिळतात.



### भव्य गढी आणि वारसा

मांडवगण येथील सिद्धेश्वर मंदिराजवळ अहिल्यादेवी होळकर यांचा भव्य वाडा, अर्थात गढी, आहे. ही गढी चारी बाजूंनी मजबूत दगडी तटबंदीने संरक्षित आहे. गढीच्या प्रवेशद्वारावर आजही हत्ती बांधण्यासाठी वापरलेले लोखंडी साखळी दोरखंड दिसतात, जे त्या काळातील स्थापत्यकौशल्याचे द्योतक आहेत. गढीशेजारी भव्य बारव बांधली आहे, तर कटाक्ष आणि वटाक्ष नदीच्या तीरावर भैरव हत्तीची समाधी आहे. याशिवाय, अहिल्यादेवींनी सिद्धेश्वर मंदिराचा घाट बांधला, जो त्यांच्या स्थापत्य आणि धार्मिक योगदानाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

### बारवांचा वारसा

श्रीगोंदा तालुक्यात अनेक बारवा आहेत, त्यापैकी मांडवगण येथील सहा बारवांचा समावेश 'महाराष्ट्र बारव मोहीम' अंतर्गत नोंदवला गेला आहे. या बारवांपैकी बहुतांश अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या आणि संवर्धित केलेल्या आहेत. शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनने या बारवांवर स्वच्छता मोहीम आणि दीपोत्सव यांसारखे उपक्रम राबवले आहेत, ज्यामुळे या वारशाचे जतन आणि प्रचार-प्रसार होत आहे.

### भद्रा प्रकारातील दुर्मिळ बारव

अहिल्यादेवींच्या वाड्यामागे भद्रा प्रकारातील एक सुंदर चिरेबंदी दगडी बारव आहे. या बारवेला दोन प्रवेशद्वारे आहेत, त्यापैकी पश्चिमेच्या प्रवेशद्वाराला सुंदर कमान आणि पूर्वी लाकडी दरवाजा होता. अशा प्रकारची बारव स्थापत्यशास्त्रात दुर्मिळ मानली जाते, जी अहिल्यादेवींच्या स्थापत्यकलेतील वैशिष्ट्य दर्शवते.

### पानिपतवीर भैरव हत्तीची समाधी

मांडवगण, कात्राबाद (ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) येथे अहिल्यादेवींच्या 'भैरव' नावाच्या हत्तीची समाधी आहे. हा हत्ती पानिपतच्या ऐतिहासिक आणि शौर्यपूर्ण युद्धात सहभागी होता, ज्यामुळे त्याला 'पानिपतवीर' म्हणून ओळखले जाते. १७७५ साली निजामाने मांडवगण येथील होळकर गढी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सरदार तुकोजी होळकर उत्तरेकडील लढाईत व्यस्त असल्याने स्वतः अहिल्यादेवी भैरव हत्तीवर स्वार होऊन माळव्यातून (महेश्वर) मांडवगण येथे आल्या. त्यांनी निजामाचा हल्ला परतवून लावला आणि गढी वाचवली. या लढाईत होळकर सेनेने विजय मिळवला, ज्यामध्ये मांडवगणचे सरदार देशमुख यांचेही मोलाचे योगदान होते. काही काळ मांडवगण येथे राहिल्या असता, वृद्धापकाळाने भैरव हत्ती मरण पावला. अहिल्यादेवींनी स्वतः कटाक्ष आणि वटाक्ष नदीच्या तीरावर दगडी चौथऱ्यावर त्याची समाधी बांधली. चौथऱ्याच्या मध्यभागी हत्तीचे दगडी शिल्प आहे, जे स्थानिक लोकांमध्ये 'हत्तीबा' म्हणून ओळखले जाते. या समाधीवर एक शिलालेख होता, जो काळाच्या ओघात नष्ट झाला.

### शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे योगदान

शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन अहिल्यादेवींचा वारसा जतन करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. स्वच्छता मोहिमांपासून ते दीपोत्सवापर्यंत, संस्थेने या ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन आणि प्रचार केला आहे. अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाच्या निमित्ताने, संस्था आणि श्रीगोंदेकरांच्या वतीने त्यांना त्रिवार मानाचा मुजरा अर्पण करण्यात आला.

> पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा मांडवगण येथील वारसा हा केवळ स्थापत्यकला किंवा ऐतिहासिक घटनांपुरता मर्यादित नसून, त्यांच्या नेतृत्व, शौर्य आणि समाजहिताच्या कार्याचा एक प्रेरणादायी ठेवा आहे. शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या प्रयत्नांमुळे हा वारसा आजही जिवंत आहे आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचेल.
>
> **– राजेश इंगळे,** वारसा अभ्यासक व अध्यक्ष, शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन.

### श्रीगोंदा येथील ऑनलाइन फसवणुकीतील ४० हजार रुपये रक्कम तक्रारदारास परत

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा तालुक्यातील भानगांव येथील संतोष वसंतराव पवार (वय ४७) यांच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या श्रीगोंदा शाखेतील खात्यातून अज्ञात व्यक्तीने टार्गेट स्टोअर या वेबसाइटद्वारे ऑनलाइन फसवणूक करून ४० हजार रुपये काढले होते. या प्रकरणाचा कसून तपास करत श्रीगोंदा पोलिसांनी तक्रारदारास गेलेली रक्कम परत मिळवून दिली आहे.

या प्रकरणी तक्रारदाराने १९३० या क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवली होती. श्रीगोंदा पोलीस ठाण्यात तक्रार प्राप्त होताच, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे आणि पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ राहुल कारभारी शिंदे, पोकॉ अरुण पवार, पोकॉ महादेव जाधव, म.पोकॉ अस्मिता शेळके, म.पोकॉ अरुणा खेडकर आणि नगर येथील सायबर पोलीस ठाणे महिला पोकॉ दीपा घोडके यांच्या पथकाने तपास सुरू केला.

पोलिसांनी सखोल तपास केला असता, फसवणुकीची रक्कम आसाममधील सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लेपेटकाटा शाखा, बारबामाह बाजार, ए. टी. रोड, ता. बारबारुह, जि. दिब्रुगड येथे असल्याचे आढळले. पोलिसांनी या शाखेशी संपर्क साधून बारकाईने तपास केला. अखेर दिनांक ३१ मे २०२५ रोजी तक्रारदार संतोष पवार यांच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या श्रीगोंदा शाखेतील मूळ खात्यात ४० हजार रुपये परत जमा करण्यात यश मिळाले.

रक्कम परत मिळाल्याने तक्रारदार संतोष पवार यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्याला भेट देऊन समाधान व्यक्त केले. नागरिकांनी अशा ऑनलाइन फसवणुकीपासून सावध राहावे, असे आवाहन पोनि. किरण शिंदे व श्रीगोंदा पोलिसांनी केले आहे.

### पारनेरला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण

**● पारनेर । वीरभूमी–**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपलं आयुष्य सामाजिक कार्यासाठी वाहुन घेतले होते. हाच योग साधून पारनेर तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त वृक्षारोपण आयोजित करून फळझाडांची लागवड केली.



यावेळी मार्गदर्शक सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. विष्णू नांदे, तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. अरविंद रेपाळे, डॉ. नितीन गाडीलकर, डॉ. स्नेहलता गवारे, डिजिटल मिडिया जिल्हाध्यक्ष पत्रकार विनोद गायकवाड, पर्यावरण मित्र लतिफ राजे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे शहराध्यक्ष भगवान गायकवाड, संतोष सोबले, श्रीनिवास शिंदे, यांचे शुभहस्ते विविध फळ वृक्षांचे रोपण करण्यात आले. वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वितेसाठी विकास मापारी आणि आदी सावळे यांनी परिश्रम घेतले.

आज जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, अहिल्यानगर डॉ. सुनिल केशव तुंबारे ३४ वर्षांची शासकीय सेवा करून सेवानिवृत्त होत आहेत. ज्यावेळी त्यांनी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त म्हणून कारभार स्वीकारला होता. त्यावेळी पारनेर येथील पशुवैद्यकीय रुग्णालयामध्ये त्यांच्या हस्ते ३५ फळ झाडांची लागवड केली होती. ती येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जपली आहेत. आज त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशीही पाच रोपांची लागवड केली हा एक योगायोगच म्हणावा लागेल.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त कोपरगाव मतदारसंघात निबंध, रांगोळी स्पर्धा

**● कोपरगाव । प्रतिनिधी–**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त कोपरगाव विधानसभा मतदारसंघामध्ये विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मा.आ. सौ. स्नेहलताताई कोल्हे व कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमांना भव्य स्वरूप देण्यात आले.

या उपक्रमांतर्गत निबंध व रांगोळी स्पर्धा घेतल्या गेल्या, ज्यांना विद्यार्थ्यांचा आणि महिलांचा भरघोस प्रतिसाद लाभला. निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींवर आधारित विचार मांडून त्यांच्या कार्यकर्तृत्वाची उजळणी केली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक – ओम प्रमोद सोनवणे, द्वितीय क्रमांक – अवनी महेश आमले, आणि तृतीय क्रमांक – उत्कर्ष पंकज जाधव यांनी पटकावला. या स्पर्धेचे पर्यवेक्षण श्रद्धा जवाद मॅडम यांनी काटेकोरपणे केले.

रांगोळी स्पर्धेमध्ये महिलांनी रंगांच्या माध्यमातून आपल्या सर्जनशीलतेद्वारे अहिल्यादेवींना अभिवादन केले. यामध्ये प्रथम क्रमांक – अनुराधा अंकुश जोशी, द्वितीय क्रमांक – वंदना संतोष मैंदड, आणि तृतीय क्रमांक – पायल चेतन पुरोहित यांनी मिळवले. या स्पर्धेचे निरीक्षण अनिल अमृतकर यांनी केले. विजेत्यांना आकर्षक बक्षिसांनी गौरवण्यात आले.

या कार्यक्रमाला शहराध्यक्ष भाजपा वैभव आढाव यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून स्पर्धकांचे कौतुक केले. उपस्थित प्रमुख मान्यवरांमध्ये कैलास खैरे, श्री. भाऊसाहेब बागुल, बंटी हलवाई, कल्पेश नरोडे, कैलास नांगरे, राहुल आढाव, सिद्धार्थ डोंगरे, प्रणव आमले, प्रशांत आढाव, किशोर शिंदे मेजर, हर्षल नरोडे, सुनील आभाळे, हर्षल जोशी, अविष्कार महिले, विकी नरोडे, राहुल नरोडे, बाळासाहेब मेथाने, चंद्रकांत वाघमारे, देविदास बागुल, श्रीकांत नरोडे, आकाश आमले यांचा समावेश होता. महिलांमध्ये सौ. आढाव ताई, सौ. जोशीताई, सौ. मैंदड ताई यांचीही उपस्थिती लक्षणीय होती.

दरम्यान, कोपरगाव विधानसभा मतदारसंघामधील विविध मंडळांमार्फत सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. कोपरगाव पूर्व मंडल अध्यक्ष विशाल गोर्डे यांनी वारी येथील जगदंबा माता मंदिर येथे स्वच्छता अभियान राबवले. कोपरगाव पश्चिम मंडल अध्यक्ष सुनील कदम यांनी कुंभारी येथील रामेश्वर मंदिरामध्ये महाआरती व वृक्षारोपणाचे आयोजन केले. कोपरगाव शहर मंडल अध्यक्षांनी श्री रामेश्वर महादेव मंदिर दत्त पार येथे स्वच्छता मोहीम राबवून निबंध व रांगोळी स्पर्धांचेही आयोजन केले.




या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व इतिहासाची ओळख निर्माण झाली. उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत संयोजकांचे कौतुक केले. विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून, अशा स्पर्धांमुळे नव्या पिढीत सर्जनशीलता व सामाजिक भान वाढीस लागते, असे गौरवोद्गार व्यक्त केले. सौ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयात पदाधिकाऱ्यांनी प्रतिमापूजन करून अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी केली.

# SPOT NEWS

## शीख समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी

**● अहिल्यानगर । प्रतिनिधी–**

शीख समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी जिल्ह्यातील शीख समाजाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील शीख समाजाचे अनेक घटक अजूनही आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत. या समाजातील नागरिकांच्या सर्वांगीन विकासासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती झाल्यास अल्पसंख्याकांसाठी असलेल्या कल्याणकारी योजना शीख समाजालाही न्याय देतील. अलीकडेच जैन समाजासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करून एक ऐतिहासिक निर्णय घेतला, त्याचे शीख समाज स्वागत करत आहे. त्याच धर्तीवर शीख समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची गरज आहे. पूर्वी अल्पसंख्याक आर्थिक महामंडळात या समाजांचा समावेश होता, परंतु बहुतेक अल्पसंख्याक योजना फक्त एका विशिष्ट समुदायास अधिक लाभदायक ठरत आहेत. परिणामी शीख समाज दुर्लक्षित राहत आहे. म्हणून, या समाजाला उद्दिष्ट ठेऊन स्वतंत्र महामंडळ स्थापन करणे ही काळाची गरज बनली असल्याचे निवेदनात म्हंटले आहे. या मागणीसाठी हरजीतसिंग वधवा, जनक आहुजा, लकी सेठी, प्रितपालसिंग धुप्पड, गुरबच्चनसिंग चुग, राजेंद्र कंत्रोड, सरबजितसिंघ सेठी, गुलशन कंत्रोड, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, सनी वधवा, सीमरजितसिंग वधवा, करणसिंग धुप्पड, हरदीपसिंग कथुरिया, सनमितसिंघ चुग, रणजीतसिंग ठकराल, राजा नारंग, मनोज मदान, किशोर रंगलानी, मंजितसिंघ चुग, कन्हैया कुकरेजा, राहुल बजाज, राजकुमार बत्रा, मन्नू कुकरेजा आदी प्रयत्नशील आहेत.

## केंद्र सरकारच्या हमीभावाच्या वाढीचे किसान सभेकडून स्वागत

**● अकोले । वीरभूमी–**

केंद्र सरकारने शेतीमालाच्या हमीभावामध्ये वाढ केली आहे. या निर्णयाचे किसान सभेच्या वतीने राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी स्वागत केले आहे. डॉ. नवले म्हणाले की, हमीभाव वाढ केल्या नुसार शेतकऱ्याला प्रत्यक्षात भाव मिळाले तरच या वाढीला अर्थ आहे. नेहमीच अशाप्रकारचे भाव जाहीर होतात. भाववाढीचे क्रेडिट घेतले जाते. प्रत्यक्षात मात्र बाजारात शेतकऱ्यांना असे वाढीव भाव मिळत नाहीत असा आज पर्यंतचा अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले. मागील वर्षी सोयाबीनच्या भावामध्ये वाढ करण्यात आली. मात्र प्रत्यक्षामध्ये मुदतीची अट लावून शेतकऱ्यांची पुरेशी सोयाबीन आधारभावाने खरेदी झाली नाही. इतरही वेगवेगळ्या पिकांबाबत हाच अनुभव शेतकऱ्यांना येत असतो. तुरीचे आधारभाव जाहीर करायचे, तूर आधार भावामध्ये वाढ करायची, दुसरीकडे मात्र सरकारनेच तूर आयात करून तुरीचे भाव बाजारामध्ये पाडायचे, अशा अनुभव येत असतो. आगामी काळात असे होऊ नये यासाठी सरकारने काळजी घेतली पाहिजे. सरकारने आधार भावाप्रमाणे बाजारभाव शेतकऱ्यांना मिळतील असे ठोस उपाय करावेत. आयात निर्यातीची धोरणे त्यानुसार करावीत आणि आधार भावापेक्षा जास्त बाजारात बाजारभाव शेतकऱ्यांना मिळेल अशी सरकारी खरेदी करावी. तरच या वाढीला काही अर्थ आहे. अन्यथा बोलाची कढी बोलाचा भात या पलीकडे आधार भावातील वाढीला शेतकऱ्याच्या लेखी अर्थ उरत नाही असेही डॉ. अजित नवले यांनी सांगितले.

# काळे कारखान्याच्या सहवीज निर्मिती प्रकल्पाचे भूमिपूजन

## सहवीज निर्मितीतून शेतकऱ्यांना अधिकचा ऊस दर देता येईल : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

सहवीज निर्मिती प्रकल्पातून कारखान्याच्या आर्थिक उत्पन्नात भर पडणार आहे. त्याचा फायदा कर्मचारी व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे. आजवर कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याने ऊस दरात कधीही मागे न राहता जिल्ह्यात सर्वाधिक ऊस दर दिला आहे. व यापुढील काळात सहवीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर मिळणाऱ्या अधिकच्या उत्पन्नातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचा दर देता येईल असा विश्वास आ. आशुतोष काळे यांनी व्यक्त केला.



कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सहवीज निर्मिती प्रकल्पाचे भूमिपूजन कारखान्याचे मार्गदर्शक व ज्येष्ठ संचालक मा.आ.अशोकराव काळे यांच्या अध्यतेखाली व कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे व त्यांच्या सुविद्य पत्नी जिल्हा बँकेच्या मा.संचालिका सौ.चैतालीताई काळे यांच्या हस्ते शनिवार (दि.३१) रोजी संपन्न झाले यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचे योग्य दाम मिळवून देवून सहकाराची पाळमूळ खोलवर रुजविण्यासाठी कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी उभारलेल्या कारखान्याच्या माध्यमातून कोळपेवाडी व परिसराचे नंदनवन झाले आहे.काळाच्या ओघात होत असलेले बदल स्विकारतांना नवीन कारखान्याची निर्मिती करून यशस्वीपणे गळीत हंगाम घेत आहोत आणि सर्वच प्रकारच्या खर्चात बचत होत आहे याचे मोठे समाधान वाटते. मागील गळीत हंगामाच्या सांगता समारंभ प्रसंगी लवकरच सहवीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचे सुतोवाच केले होते. त्याची पूर्तता करतांना आज प्रत्यक्षात सहवीज निर्मिती प्रकल्पाबरोबरच भूमिपूजन झाले आहे. त्यामुळे कारखान्याच्या प्रगतीबरोबरच ऊस उत्पादक शेतकरी व कर्मचारी यांचे देखील कल्याण होणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण, संचालक दिलीपराव बोरनारे, सुधाकर रोहोम, राजेंद्र घुमरे, सचिन चांदगुडे, सूर्यभान कोळपे, श्रीराम राजेभोसले, प्रवीण शिंदे, अनिल कदम, अशोक मवाळ,ॲड.राहुल रोहमारे, सुनील मांजरे, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे, डॉ.मच्छिंद्र बर्डे, सौ.वत्सलाबाई जाधव, सौ.इंदुबाई शिंदे, दिनार कुदळे, प्रशांत घुले, गंगाधर औताडे, श्रावण आसने, प्र.कार्यकारी संचालक सुनिल कोल्हे आसवणी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे,सेक्रेटरी बाबा सय्यद,डेप्यु.सेक्रेटरी संदीप शिरसाठ तसेच सर्व सलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक व पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक सुनिल कोल्हे यांनी केले. सूत्रसंचालन सेक्रेटरी बाबा सय्यद यांनी केले तर आभार संचालक सूर्यभान कोळपे यांनी मानले.

## अगस्ती महाविद्यालयाचे प्रा. सलीम शेख अमेरिकेत संशोधन जर्नलचे रिव्ह्यूअर

**● अकोले । प्रतिनिधी–**

अगस्ती महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे प्राध्यापक सलिम शेख यांची Science Publishing Group, New York, United States of America च्या English Language, Literature and Culture (इंग्रजी भाषा, साहित्य आणि संस्कृती) या प्रतिष्ठित संशोधन जर्नलसाठी रिव्ह्यूअर (Reviewer) म्हणून निवड झाली. ही निवड Science Publishing Group, New York तर्फे पुढील ३ वर्षांकरिता करण्यात आली आहे. प्राध्यापक सलिम शेख यांचे आत्तापर्यंत १० आंतरराष्ट्रीय खडडछ जर्नल्स मध्ये संशोधन लेख प्रकाशित झालेले आहेत. त्यांनी मागील दोन महिन्यांच्या कालावधीत २ आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत (Austria आणि United Kingdom) रिसर्च पेपर प्रेझेंटेशन केलेले आहे. त्यांचे अनेक पुस्तकांवरील परीक्षण (Book Review) तसेच अनेक पुस्तकांमध्ये Book Chapter देखिल प्रकाशित झालेले आहे. ते सध्या संगमनेर महाविद्यालयात, महाराष्ट्रातील



नावाजलेले प्राध्यापक, इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक व पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यास मंडळाचे विद्यमान सदस्य, प्रोफेसर डॉ. उमेश शिवराम जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हॉरर साहित्य व फिल्म स्टडीज या विषयावर पीएचडी करत आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी आमदार वैभवराव पिचड, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, स्वीकृत विश्वस्त मधुकरराव सोनवणे, स्वीकृत विश्वस्त सुरेशराव कोते, अध्यक्ष सुनिल दातीर, सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख, खजिनदार धनंजय संत कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य, प्राचार्य डॉ. भास्करराव शेळके, शिक्षणाधिकारी संपतराव मालुंजकर, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनच्या आयटीआयच्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये यशस्वी निवड

**● नगर । वीरभूमी–**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनच्या अहमदनगर येथील इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच पार पडलेल्या कॅम्पस मुलाखतींमध्ये उल्लेखनीय यश मिळवत, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामवंत कंपन्यांमध्ये यशस्वीरीत्या निवड मिळवली आहे.

ग्रामीण भागातून आलेल्या या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्य, मेहनत आणि संस्थेच्या गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाच्या आधारे औद्योगिक क्षेत्रात ठसा उमटवला आहे. एकूण ८८ विद्यार्थ्यांची निवड ही संस्था व विद्यार्थ्यांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या कॅम्पस ड्राइव्हमध्ये सहभागी झालेल्या कंपन्यांमध्ये काइनेटिक वॉट्स अँड व्होल्ट्स लिमिटेड, रेंज एक्स, श्रीजी प्रोसेस इंजिनिअरिंग वर्क्स लिमिटेड (अहिल्यानगर) आणि भवानी इंडस्ट्रीज प्रा. लि. (चाकण, पुणे) यांचा समावेश होता. इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, डिझेल मेकॅनिक, मेकॅनिक मोटर व्हेईकल




आणि ड्राफ्ट्समन मेकॅनिकल या प्रमुख ट्रेड्समधील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

संस्थेचे प्राचार्य अनिल सूर्यवंशी म्हणाले, आम्ही विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक शिक्षणच नव्हे तर सॉफ्ट स्किल्स, करिअर गाईडन्स आणि इंटरव्ह्यू प्रिपरेशन यांसारख्या कौशल्यांचेही प्रशिक्षण दिले. त्यामुळेच आमचे विद्यार्थी आत्मविश्वासाने आणि तयारीनिशी यश मिळवू शकले.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले, हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, संस्थेच्या विश्वासार्हतेचे आणि ग्रामीण भागातील युवकांना सक्षम करण्याच्या आमच्या प्रयत्नांचे फलित आहे. संस्था गेली तीन दशके विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. गुणवत्तापूर्ण औद्योगिक शिक्षणाच्या माध्यमातून, ग्रामीण विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी तयार करण्याचे कार्य संस्था सातत्याने करत आहे.

या यशस्वी कॅम्पस ड्राइव्हसाठी जलसंपदा मंत्री व चेअरमन ना. राधाकृष्ण विखे पाटील, सीईओ डॉ. सुजय विखे पाटील, डायरेक्टर डॉ. पी. एम. गायकवाड, डायरेक्टर सुनील कोल्हापुरे, डायरेक्टर डॉ. अभिजीत दिवटे, तसेच प्लेसमेंट अधिकारी अरुण म्हस्के यांचे अभिनंदन केले आहे.

# पाथर्डीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सहात

## त्रिशताब्दी जयंतीनिमित्त पाथर्डी शहरातून भव्य मिरवणूक । सर्व पक्षियांच्यावतीने अभिवादन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुका राजमाता अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा त्रिशताब्दी जयंती उत्सव सोहळा मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरा करण्यात आला.

शहरातील नाईक चौकात फुलांनी सजवलेल्या भव्य व्यासपीठावर राजमाता अहिल्यादेवी यांचा पुतळा स्थानापन्न करण्यात आला होता. यावेळी उत्सव समितीचे सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत महीला भगिनींच्या हस्ते दिपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार मोनिकाताई राजळे, केदारेश्वरचे चेअरमन ऋषिकेश ढाकणे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, शारदा हंडाळ, सुनील नरोटे, नामदेव लबडे, धनंजय बडे, डॉ. मृत्युंजय गर्जे, विस्तार अधिकारी रामनाथ कराड, बंडू बोरुडे, दिगंबर गाडे, सुनील पारखे, गहीनीनाथ शिरसाठ, शिवशंकर राजळे, हुमाऊन आतार डॉ. दीपक देशमुख, डॉ. विनय फड, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अरविंद पारगावकर, नंदकुमार शेळके, महेश बोरुडे, रामनाथ बंग, मुकुंद गर्जे, वंचितचे तालुकाध्यक्ष श्रीकांत बोर्डे, गणेश चितळकर, सरपंच अशोक गाडे आदींसह विविध मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवींना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



फेटाधारी सहभागी महीला व उत्सव समितीचे कार्यकर्ते, समाज बांधव फत्तेपुर, मोहरी, दिंडेवाडी, चव्हाणवाडी येथील पारंपरिक धनगरी गजनृत्य पथक व शेकडो तरुणांनी धारण केलेला एकसारखा आकर्षक पोशाख, व्यासपीठासमोरील भव्य रांगोळी, फटाक्यांची आतिषबाजी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. या त्रिशताब्दी वर्षानिमित्त १०० राजमाता अहिल्यादेवींच्या प्रतिमा, १०० धनगरी वस्त्र व १०० पुण्यश्लोक अहिल्यादेवी वरील माहिती पुस्तिका यांचे वितरण करण्यात आले.

यानिमित्त तालुक्यात ही विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. आजच्या त्रिशताब्दी जयंती उत्सव समितीने अतिशय दिमाखदारपणे उत्साहात नियोजन केले. समितीच्या कुठल्याही कार्यकर्त्यांनी प्रसिद्धी अथवा मोठेपणा न दाखवता समर्पक भावनेने कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. दरवर्षी एवढ्याच मोठ्या उत्साहाने जयंती साजरी केली जाईल अशी घोषणा यावेळी करण्यात आली. प्रास्ताविक अशोक चोरमले यांनी केले. सूत्रसंचालन महेश वाघमोडे यांनी केले तर बजरंग सुडके यांनी आभार मानले.

> एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून राजमाता अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. एक कुशल योद्धा, रणरागिणी, न्यायप्रिय शासक म्हणून राजमाता अहिल्याबाई सर्वश्रुत आहेत. स्त्रीचे सृजनात्मक दर्शन आणि स्त्रीशक्ती या दोन्हींचा उत्तम मिलाफ त्यांचा जीवनचरित्रात आढळून येतो. त्यांचा जन्म नगर जिल्ह्यात व धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचा जिल्हावासीयांना अभिमानच आहे.
>
> **– ह.भ.प. राधिकाताई खेमनर**

## अमृतवाहिनी एम.बी.ए चा विद्यार्थी प्रज्वल साळुंके याला १५ लाख पॅकेजची नोकरी



**● संगमनेर । वीरभूमी–**

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी एम.बी.ए. महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रज्वल दिपक साळुंके याची आंतरराष्ट्रीय नामांकित कंपनीमध्ये १५ लाख रुपये वार्षिक पॅकेजवर सेंट किटस अँड नेव्हिस या कॅरिबियन बेटांवर नोकरीसाठी निवड झाली. आपल्या उत्कृष्ट शैक्षणिक, नेतृत्वगुण आणि व्यावसायिक कौशल्याच्या जोरावर ही संधी मिळवली.

प्रज्वल म्हणाला की, अमृतवाहिनी एम.बी.ए मध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व व्यक्तीमहत्व विकास केला जातो. महाविद्यालयामध्ये नियमित वेगवेगळया क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, मॉक इंटरव्हयु असे अनेक उपक्रम घेतले जातात. अमृत ट्रॉफीच्या माध्यमातुन विद्यार्थ्याचे इंग्रजीवरील प्रभुत्व, बिझनेस क्वीज, बिझनेस स्कील, मॅनेजर्मेन्ट विषयावरील ॲड शो, सिनेमा ॲट्रोग्राफी, डेटा ॲनेल्टीक्स अशा प्रमाणे अनेक उपक्रम राबविले जातात. याच्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समन्वय व नेत्वृत कौशल्य यांची वाढ होते व त्यामुळे व्यावसायाभिमुख विद्यार्थ्यांची जडण घडण होते. यासर्व गोष्टीमुळे माझी निवड झाली आहे.

प्रज्वलचे माजी महसुल मंत्री आमदार बाळासाहेब थोरात , संस्थेचे विश्वस्त मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयु देशमुख, इंद्रजितभाऊ थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल बी. शिंदे, मॅनेजर प्रा. व्हि. बी. धुमाळ शैक्षणिक संचालक डॉ. जे. बी. गुरव, महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एम. लोंढे व अमृतवाहिनी एम. बी. ए. महाविद्यालयातील सर्व स्टाफने अभिनंदन केले.

# पाथर्डीतील मध्यवर्ती व वर्दळीच्या ठिकाणी वळूंच्या झुंजीने उडवला थरकाप

## मोकाट वळूंचा बंदोबस्त करण्याची नागरिकांची मागणी | अन्यथा पालिकेविरोध आंदोलन करण्याचा इशारा

**पाथर्डी | वीरभूमी –**

शहरातील गांधी चौक या मध्यवर्ती व वर्दळीच्या ठिकाणी भल्या सकाळीच वळूंची झुंज सुरू झाल्यानंतर मोठा गोंधळ उडाला. यात अभिजीत गुजर हा तरुण व्यावसायीक गंभीररित्या जखमी झाला असून, नगर येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तरी नगर परिषदेने तातडीने मोकाट जनावरांसाठी मोहीम राबवावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा येथील त्रस्त नागरिकांनी दिला आहे.

शहर परिसरामध्ये बाहेरील गावातून अनेक वळू आणून सोडल्याने शहर परिसरातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. यापूर्वी अपवादात्मक दिसणारे वळू आता शहराच्या प्रत्येक भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. दिवसेंदिवस वळूच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्यामुळे अचानकपणे वळुंची झुंज कुठेही व केव्हाही सुरू होते.विशेषता गजबजलेल्या भागांमध्ये वळूंची झुंज



सुरू झाल्यानंतर नागरिकात एकच घबराट निर्माण होते व त्या भागात अघोषित संचारबंदी सारखे परिस्थिती निर्माण होते. कधी – कधी तर दोन – दोन तास ही झुंज सुरू असते.यामुळे अनेकांना आपल्या वाहतुकीचा मार्ग बदलावा लागतो. तर झुंज सुटल्यानंतर वळू उधळतच पळत असल्याने नागरिक देखील जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. यासह दुचाकी–चार चाकी वाहनांचे देखील मोठे नुकसान होत आहे. वळूंची झुंज लागताच पालिका प्रशासनाने तातडीने झुंज सोडवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

काल सकाळी शहरातील मध्यवस्तीत असणाऱ्या गांधी चौक येथे सकाळी सातलाच वळूंची झुंज सुरू झाली. तब्बल दीड तास ही झुंज सुरू होती. यादरम्यान पूर्णपणे वाहतूक ठप्प झाली होती. यातील एका वळूने माघार घेत अचानकच धूम ठोकल्याने एकच गोंधळ उडाला. या गोंधळात उधळलेल्या वळूची अभिजीत गुजर या युवकाला जोरदार धडक बसली. यामुळे गुजरे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

दरम्यान शहरभर मोकाट फिरणाऱ्या वळूंची धरपकड मोहीम सुरू करून नगर परिषदेच्या कोंडवाड्यात ठेवण्याची अथवा गो शाळेत सोडण्याची मागणी नागरिकाकडून होत आहे.

### वळूंना पकडण्याची मोहीम चालू करू : लांडगे

वाळूंच्या वाढत्या समस्या व तक्रारी लक्षात घेऊन नगरपरिषदेने स्वमालकीचा सुमारे तीन लाख रुपये किमतीचा पिंजरा विकत घेतला आहे. पुढील चार दिवसांमध्ये हा पिंजरा शहरात दाखल होत असून यानंतर तातडीने वळूंना पकडण्याची मोहीम सुरू होईल.व पकडलेल्या सर्व वळुंना गो शाळेत सोडण्यात येईल असे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी सांगितले.

### मोकाट वळूंना तातडीने पकडावे : गुजर

गेल्या काही महिन्यापासून शहरवासीय नागरिक व परिसरातील शेतकऱ्यांना मोठा त्रास होत असून याचा मोठा फटका मलादेखील बसला आहे. मी मागील दोन दिवसापासून अहिल्यानगर येथे उपचार घेत असून मोठी शस्त्रक्रिया देखील माझ्यावर झाली आहे. याची दखल नगर परिषदेने तात्काळ व गांभीर्याने घ्यावी, अशी मागणी गुजर यांनी केली आहे.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर धर्म, न्याय आणि सेवेचा दीपस्तंभ

## आ. आशुतोष काळे | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी

**कोपरगाव | प्रतिनिधी–**

ज्या काळात महिलांना ामाजिक जीवनात फारसा वाव सतांना राजमाता अहिल्यादेवी ोळकर यांनी मंदिरं बांधली, र्मशाळा उभारल्या, गरिबांना मदत ली. त्या जनतेवर प्रेम करणाऱ्या मळ राज्यकर्त्या होत्या. त्यांनी हिलांना सन्मानाने जगण्याचा ार्ग दाखवला. राजमाता अहिल्यादेवी होळकर या केवळ क राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या क दूरदृष्टी संपन्न, न्यायप्रिय, ाणि समाजहिताचा विचार रणाऱ्या आदर्श प्रशासक आणि नकल्याणकारी कुशल राजकर्त्या ोत्या. त्यांनी केलेलं समाजकार्य र्म, न्याय आणि सेवेचा दीपस्तंभ सल्याचे प्रतिपादन आ. आशुतोष ाळे यांनी केले आहे.

राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ्रेशताब्दी जयंती उत्सवानिमित्त



कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी येथे मोठ्या उत्सवात त्यांचा ३०० वा जयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी आ.आशुतोष काळे यांनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे नेतृत्व, सेवाभाव यांचे प्रतीक असून त्यांचा आदर्श आपल्याला प्रेरणा देतो. त्यांचे शासन केवळ रस्ते, घाट, धर्मशाळा व मंदिरे उभारण्यातच नव्हते, तर त्यांनी लोकहिताच्या दृष्टीने घेतलेले निर्णय हे आजही आदर्श मानले जातात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ एक महान स्त्री शासिका नव्हत्या, तर त्या एक आदर्श समाजसेविका, धार्मिक सहिष्णुतेचे प्रतीक आणि न्यायप्रिय प्रशासनकर्त्या होत्या. ज्या काळात महिलांना सार्वजनिक जीवनात फारशी संधी नव्हती, अशा काळात अहिल्यादेवींनी नेतृत्व केले हेच त्यांच्या धैर्याचे आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक असून त्यांचे मूल्य, कार्यपद्धती आणि सेवा–भाव यांचा आदर्श समोर ठेवून नवा सामाजिक बदल घडवण्याची प्रेरणा प्रत्येक पिढीला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जयंती उत्सव समिती व तुलसी आय हॉस्पिटल नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्ररोग निदान शिबिराचे आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य, व कोळपेवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उसणे घेतलेल्या पैशाच्या वादातून पाथर्डी शहरात मारामारी; दोघे जखमी

**पाथर्डी | वीरभूमी–**

भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या मयुर प्रदीप ढोले याला सात ते आठ जनांनी लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. मयुरचा मित्र ऋषी संजय फुंदे हा देखील यामध्ये जखमी झालेला आहे. मुंडे पार्क येथे २४ मे २०२५ रोजी सायंकाळी साडेसात वाजता ही घटना घडली. उसणे पैसे घेतल्याच्या कारणावरुन झालेल्या वादात प्रतिक जायभाये, राहुल शिरसाट, शुभम दराडे, आदित्य आव्हाड, जगदिश महाजन व इतर २ ते ३ अशा आठ जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

प्रतिक बाबासाहेब जायभाये (रा. आनंदनगर) याने नाथनगर येथील ऋषी संजय फुंदे यांच्या कडुन मयुर ढोले याच्या समक्ष जानेवारी २०२५ मधे उसणे पैसे घेतले होते. फुंदे याने प्रतिक जायभाये याला उसणे पैसे मागितले त्याचा राग आल्याने प्रतिक जायभाये याने त्याचे साथीदार राहुल शिरसाट (रा. शिरसाटवाडी), शुभम दराडे (रा. पागोरी पिंपळगाव), आदित्य आव्हाड (रा. हंडाळवाडी), जगदिश महाजन (रा. शिरसाठवाडी) व इतर २ ते ३ असे आठ जण मुंडे पार्क येथे बसलेल्या ऋषी फुंदे व मयुर ढोले यांच्याकडे गेले. तेथे प्रतिक याने व त्याच्या मित्रांनी ऋषी फुंदे याला लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण करण्यास सुरवात केली. प्रतिक जाय़भाये हा ऋषी फुंदे याला म्हणाला तुझा हिशोब आज पुर्णच करतो आणि जबर मारहाण सुरु केली. मयुर ढोले हा भांडण सोडविण्यासाठी गेला असता शुभम दराडे (रा. पागोरी पिपंळगाव) याने लोखंडी रॉडने डोक्यात घालुन व त्याच्या मित्रांनी लाकडी दांडक्याने मारहाण करुन ढोले याला जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. ऋषी फुंदे याच्यावर देखील उपचार करण्यात आले आहेत. बेशुद्ध पडलेल्या अवस्थेत मयुर ढोले याला दवाखान्यात दाखल केले होते. आठ दिवस नगर येथील उपचारानंतर मयुर ढोले याला घरी पाठविण्यात आले आहे. मयुर प्रदीप ढोले याच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक महादेव गुट्टे तपास करीत आहेत.

पाथर्डीत गुंडाराजचे लोण आले आहे. उसणे पैसे व सावकारकीच्या कारणावरुन अनेकांना धमकविण्याचे काम सुरु आहे. पाच रुपयापासुन पंचवीस रुपये शेकडा व्याज घेतले जाते. यातुन भांडणे वाढत आहेत.

# जिल्ह्यातील एकल महिलांसाठी सुरु करण्यात येणाऱ्या प्रकल्पाला सहकार्य करावे

## पालकमंत्री विखे पाटील यांची मुख्यमंत्री फडणवीस यांचेकडे मागणी

**नगर | वीरभूमी –**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची प्रेरणा घेवून जिल्ह्यातील एकल महीलांसाठी सुरू करण्यात येणाऱ्या प्रकल्पाकरीता राज्य सरकराने सहकार्य करण्याची विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी केली.

चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तिनशेव्या जयंती सोहळ्याच्या निमिताने आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात बोलताना मंत्री विखे यांनी जिल्ह्यातील एकल महीलांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करून या महीलांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घेत असल्याचे सांगितले.

जिल्ह्यात केलेल्या सर्व्हेक्षणात एक लाख एकल महीलांची संख्या समोर आली असली तरी यामध्ये वाढ होईल. एकल महिलांना अर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू करण्यात येत असलेल्या प्रकल्पात या महीलांना कौशल्य प्रशिक्षण केंद्राशी जोडण्यात



येणार असल्याचे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

चौंडी येथील तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करून मंत्री विखे पाटील यांनी अहिल्यानगर शहरातही महीला सक्षमीकरणाचे प्रेरणास्थान म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.चार मोठ्या राष्ट्रीय महामार्गाना शहर जोडले गेले असल्याने अध्यात्मिक पर्यटन विकसित होण्यासाठी शहरातील स्मारकाला निधी देण्याची आग्रही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना मंत्री विखे पाटील यांनी आपल्या भाषणात केली आहे.

# अल्पवयीन मुलीस गर्भवती करणाऱ्या आरोपीस १० वर्षे सक्तमजुरी

**नगर | वीरभूमी–**

अल्पवयीन मुलीस बळजबरीने शरीरसंबंध ठेवून गर्भवती केल्याप्रकरणी विशेष जिल्हा न्यायाधीश श्रीमती माधुरी एच. मोरे यांनी आरोपी शिरीष उर्फ मुन्ना भाउसाहेब कावले (वय ३८ वर्षे, रा. कावले वस्ती, शहरटाकळी, ता. शेवगाव) याला १० वर्षे सक्तमजुरी व दंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणी सरकारी वकील म्हणून विशेष सरकारी वकील ॲड. मनिषा पी. केळगंद्रे–शिंदे यांनी काम पाहिले.

सदर घटनेची थोडक्यात हकिकत अशी की, दि. ५/६/२०२३ रोजी पिडीत मुलीचे आई हिने शेवगाव पोलीस स्टेशनला आरोपी शिरीष उर्फ मुन्ना भाउसाहेब कावले याने पिडीत ही घरात एकटी असताना तिचेशी बळजबरी करून तिच्यासोबत शारीरीक संबंध करून गर्भवती केल्याप्रकरणी भा.दं.वि. कलम ३७६ (१) (२) (जे) (एन), ४५२, ५०६ तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करणारा कायदा कलम ३,४,५ (२) (एल) ७ व ८ अन्वये फिर्याद दिलेली होती. त्यानंतर सदर प्रकरणी पिडीतेने पोलीसांसमोर जबाब दिला होता की, दि. २६/०१/२०२३ रोजी सकाळी ११ च्या सुमारास पिडीत मुलगी घरी एकटी असताना तिचे आईवडील शेतात कामावर गेले असताना, गावातील राहणारा आरोपी शिरीष उर्फ मुन्ना भाउसाहेब कावले हा पाणी पिण्याच्या निमित्ताने घरी आला व पिडीतेला बळजबरी करू लागला त्यावेळी पिडीतेने नकार दिला असता, आरोपी तिला म्हणाला की, मला तू खूप आवडतेस, तुझ्यासोबत लग्न करायचे आहे. तू जर माझ्यासोबत लग्न केले नाही तर मी तुला व तुझे आईवडीलांना जीवे मारून टाकीन अशी धमकी देउन आरोपीने पिडीतेसोबत बळजबरीने शारीरिक संबंध केले. त्यानंतर आरोपी हा पिडीत एकटी घरी असताना नेहमी पिडीतेच्या घरी यायचा व तिचे सोबत बळजबरीने शरीर संबंध करायचा व धमकी देउन निघून जायचा. पिडीत आरोपीच्या धमकीला घाबरलेली असल्याने तिने तिच्या आईवडीलांना काही सांगितले नाही. परंतु पिडीतेचे पोट दूखत असल्याने व आरोपीने पिडीतेवर वेळोवेळी शारीरीक संबंध केल्याने पिडीतेस आरोपीपासून दिवस गेले असल्याचे सांगितले होते. पिडीतेचा जबाब घेतल्यानंतर पोलिसांनी पिडीतेस मेडीकल तपासणी साठी सुरूवातील ग्रामीण रुग्णलयात, त्यानंतर नगर येथील सिव्हील हॉस्पीटल येथे पाठविले. पिडीत मुलीचे वय कमी असल्याने सिव्हील हॉस्पीटल येथे पिडीतेचा गर्भपात करण्यात आला. घटनेचा संपूर्ण तपास शेवगाव येथील सपोनि. आशीष शेळके यांनी करून मा. न्यायालयात आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकुण १८ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये अल्पवयीन पिडीत मुलगी तसेच पिडीत मुलीचे आई, पंच साक्षीदार, तपासी अधिकारी स.पो.नि, आशीष शेळके तसेच यासंदर्भात मुख्याध्यापक, शेवगाव पंचायत समितीचे प्रशासकीय अधिकारी भारत चौरे, त्याचबरोबर पिडीतेच्या उपचारासंबंधात शेवगाव ग्रामीण रुग्णालय येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कुमावत, डॉ. दुवाडा तसेच अ. नगर सिव्हील हॉस्पीटल येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. पगारीया, डॉ. घुगरे, डॉ. उंदरे, डॉ. मंगेश राउत, डॉ. स्नेहल इंगळे यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्याचबरोबर पिडीत मुलीच्या गर्भाच्या अंशाच्या चाचणीबाबत नाशिक वैद्यकीय प्रयोगशाळा येथील रासायनिक अधिकारी मारूती घुगे यांची साक्ष नोंदविण्यात आली. या केसची सुनावणी चालु असताना सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, पिडीत मुलगी ही घटनेच्या वेळी केवळ १६ वर्षर्षाची होती. आरोपीचे वय ३८ वर्ष होते. तसेच घटनेच्या वेळी आरोपीचे लग्न झालेले असताना देखील आरोपीने अल्पवयीन असलेल्या पिडीत मुलीवर बळजबरी करून तिला धमकी देउन गर्भवती केलेले आहे. तसेच गर्भवती झाल्याने पिडीत मुलीवर अतिशय कमी वयामध्ये गर्भपात करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे तिच्या शरीरावर गर्भपाताच्या शस्त्रक्रियेच्या खुणा आढळून येतात, त्यामुळे तिच्या भविष्यावर या गोष्टीचा मोठा परिणाम होणार आहे. अशा कमी वयामध्ये घडलेल्या घटनेमुळे बालमनावर अतिशय वाईट परिणाम होत असतो व त्याचे ओरखडे आयुष्यभर त्यांचे मनावर पडतात. आरोपीने अत्यंत वाईट पध्दतीने सदरची घटना केलेली आहे. त्यामुळे आरोपीला जर या केसमध्ये निर्दोष सोडले तर समाजातील वाईट प्रवृत्ती वाढीस लागून लहानग्या अल्पवयीन मुलांवर अशा घटना पुन्हा–पुन्हा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा करण्यात यावी. सरकारी वकीलांचा युक्तीवाद तसेच आलेला संपूर्ण पुरावा ग्राहय धरून मा. न्यायालयाने आरोपीस १० वर्षे सक्तमजुरी व दंडाची शिक्षा ठोठावली. सदर खटल्याचे कामकाज सरकारी वकील म्हणून ॲड. मनिषा पी. केळगंद्रे – शिंदे यांनी पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी म.पो.कॉ. रेश्मा अडसूळ, शेवगाव पोलीस स्टेशनचे पो.कॉ. अशोक बेळगे, तसेच मुळ फिर्यादीतर्फे ॲड. जनार्दन एकलहरे यांनी सहकार्य केले.